॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव, दि. २२ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या स्कूल ऑफ केमिकल सायन्सेसच्या एकूण ५० पदव्युत्तर विद्यार्थ्यांना शै. वर्ष २०२५-२६ मध्ये देशातील नामांकित केमिकल आणि मॅन्युफॅक्चरिंग कंपन्यांकडून नोकरीच्या संधी मिळाल्याने या प्रशाळेने उत्कृष्ट इंडस्ट्री भरतीची आपली परंपरा कायम ठेवली आहे. यशस्वीविद्यार्थ्यांचे कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी यांनी अभिनंदन केले आहे.

विद्यापीठाच्या प्राध्यापकांनी तयार केलेल्या प्रगत प्रयोगशाळा कौशल्याचा आणि भक्कम वैचारिक पायाचा फायदा घेत, वर्षानुवर्ष उच्च-स्तरीय संस्था कॅम्पसमध्ये परत येतात व विद्यार्थ्यांना बाहेर कुठेही न जाता आयती नौकरी संधी उपलब्ध होत असते. चांगला प्लेसमेंट रेट हा स्कूल ऑफ केमिकल सायन्सेस प्रशाळेतील उपलब्ध उच्च शिक्षित प्राध्यापक वर्ग, सुसज्ज प्रयोगशाळा, अद्ययावत अभ्यासक्रम, संशोधक पूरक वातावरण, उच्च कौशल्य आधारित स्टाफ या सर्वाचा परिपाक असल्याचा परिणाम म्हणून तब्बल ५०विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी मिळाली आहे. या विद्यार्थ्यांना परिसर मुलाखतीमध्ये इंडस्ट्री मार्फत केमिकल क्षेत्राचा कणा असलेल्या प्रमुख तांत्रिक पदांसाठी आकर्षक वेतनावर मोठ्याप्रमाणात भरती करण्यात आली. त्यात १) संशीचन आणि विकास (R & D) रसायनशास्वज्ञ २) गुणवत्ता नियंत्रण (QC) अधिकारी ३) उत्पादन (Production) आणि ४) पोस्ट रसायनशास्त्रज्ञ म्हणून विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. प्रशाळेमार्फत परिक्षा झाल्यानंतर एक महिन्याच्या आत ५० विद्यार्थ्यांना नोकरी मिळाली आहे. नव्या शैक्षणिक धोरण-२०२० अंतर्भुत ऑन जॉब ट्रेनिंग आणि तिसऱ्या व चौथ्या सत्राला असलेला संशोधन प्रकल्प अतिशय गांभिर्यान केल्यामुळे विद्यार्थ्यानी चांगल्या पगाराच्या नौकऱ्या मिळत आहेत असे प्रशाळेचे संचालक प्रा. दिपक दलाल यांनी सांगितले

विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. व्हि. एल. माहेश्वरी तथा स्कुल ऑफ केमिकल सायन्सेसचे संचालक प्रा. दिपक एस. दलाल, प्लेसमेंट समन्वयक प्रा. यु. डी. पाटील, प्रा. ए. एम. पाटील, प्रा. आर. एस. बेंद्रे, प्रा. व्हि. व्हि. गिते तसेच प्रशाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. तसेच विद्यापीठ प्रशासनाने, प्लेसमेंट मिळालेल्या सर्व विद्यार्थ्यांना व्यावसायिक वैज्ञानिक जगात पदार्पण करताना उज्वल आणि यशस्वी भविष्यासाठी शुभेच्छा देत त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

.......................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: २२ जून, २०२६

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता